कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडुज.

विद्यार्थीनीचे नाव - घार्गे स्वराली शंकर

रोल नं. - 427

विषय - सहकाराचा विकास

वर्ग - B.com III

मार्गदर्शक - प्रा. खोत C.M.

Year - 2017-18

Scanned with CamScanner

Page:
Date :

प्र1 सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका / महत्त्व स्पष्ट करा ?

→ ★ अर्थ ★

सहकार (co-operation) हा शब्द मूळ लॅटिन co-operari या शब्दापासून तयार झालेला असून co याचा अर्थ सह आणि operari याचा अर्थ कामकरणे असा आहे. म्हणजेच परस्पर साहाय्य करणे. किंवा सर्वांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करणे होय.

सहकार ही लोकशाही, चारित्र्य, बंधूभाव, शांतता, व प्रगती या अधिष्ठानावर आधारलेली अशी एक आदर्श समाज व्यवस्था होय की ज्याच्यामध्ये समान निष्ठा असणारे लोक एकत्र येतात.

★ व्याख्या ★

एच कॅलव्हर्ट :—

" आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीसाठी स्वच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तींनी एकत्र येवून निर्माण केलेली संघटना म्हणजेच सहकार होय."

Page:
Date :

पि. एच कॅसलमन :-
" समाजीक आश्रय असणारी आर्थिक पद्धती म्हणजे सहकार होय."

★ भूमीका व महत्व ★

प्रस्तावना :→
अर्थव्यवस्थेतील अविकसीत भागांगाचे विकसीत भागात रुपांतर करण्याच्या प्रक्रीयेला आर्थिक विकास असे म्हटले जाते.

सहकारी क्षेत्र हे अनेक सहकारी क्षेत्रांवर ~~अव~~ अवलंबून असते. त्याचे अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात फायदे होतात. सहकारी क्षेत्र हे अनेक वेगवेगळ्या मार्गाने निर्माण झाले आहे. सहकारी क्षेत्रात अनेक विविध घटक समाविष्ट्य केले जातात.

सहकारी क्षेत्र हे आर्थिक विकासात कोणती भूमिका पार पाडते हे पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

## ① कृषी विकास :—

देशाच्या आर्थिक क्षेत्रात कृषी क्षेत्राचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. विकसनशील देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा 50% च्याहुन अधिक आहे. सहकारी क्षेत्रात कृषी उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावा लागतो. व त्याच बरोबर शेतकरी वर्गाची सावकारापासून मुक्तता करणे शेतीसाठी अल्प मध्यम दिर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करणे शेतीसाठी अवजारे बि-बियाणे खते जंतूनाशकांचा पुरवठा इ. कार्य करावे लागते. बदलत्या जागतीक परीस्थीतीत सहकारी संस्थांना कृषी उत्पन्नात वाढ करणे खर्च कमी करणे सभासदांच्या उत्पादनांना अधीक भाव मिळवून देणे या बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे लागत आहे.

## ② कृषी संशोधन :—

कृषी क्षेत्र विकासात सहकार क्षेत्र महत्त्वाची भूमीका पार पाडत असते. त्यामध्ये कृषी संशोधनाचे कार्य अत्यंत आवश्यक ठरते. यामध्ये धान्यांच्या नविन जाती शोधणे कृषी महाविद्यालय यांच्या मदतीने बि-बियाणांची उत्पादन करणे.

Scanned with CamScanner

ऊस, संशोधन खतांचा वापर पाणीपुरवठा व्यवस्थापक पिक संरक्षण इ. विचार करावा लागतो तसेच शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे, पिकांची घ्यावयाची काळजी इ. कार्यात सहकारी क्षेत्राची कामगिरी विशेष महत्वाची आहे.

## ३] औद्योगिक विकासास चालना :—

औद्योगिक क्षेत्राच्या विकासात सहकारी क्षेत्रास महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. अर्थव्यवस्थेतील ८०% उद्योग हे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. सहकारी क्षेत्राद्वारे कृषी क्षेत्राचा विकास घडविण्याचे कार्य चालते. ग्रामीण भागात कृषी उद्योगांचा विकास घडविण्याचे कार्य सहकारी संस्था करु शकतात. सहकाराच्या क्षेत्राखाली कृषी उत्पादकांना एकत्र आणून सहकारी साखर कारखाने सहकारी सुतगिरण्या सहकारी दुग्ध प्रक्रिया संस्था सहकारी खत कारखाने इ. उद्योगांचा सहकारी तत्वांवर विकास करता येतो. अशा उद्योगांना लागणारा कच्चामाल ग्रामीण भागातच उपलब्ध असल्याने उत्पादन खर्च कमी होतो व कृषी उत्पादकांच्या शेत मालास चांगली किंमत देता येते.

Scanned with CamScanner

(4) <u>लघु उद्योगांचा विकास</u> :—

ग्रामीण अर्थव्यवस्थेत लघु उद्योगांना विशेष महत्व असून सहकारी क्षेत्र, ग्रामीण भागांतील कारागीर हस्त उद्योग, रेशीम, विणकर, ~~कागद~~ कागद निर्मिती वृक्ष संवर्धन साबन निर्मिती औषधी वनस्पती, निर्मिती इ. उद्योगांच्या विकासासाठी अल्पव्याज दरात कर्जे देणे कारागिरांना प्रशिक्षण देणे उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देणे. इ. बाबतीत सहकार क्षेत्राची भूमीका विशेष महत्वाची आहे. त्यामुळे अल्प उत्पन्न गटातील व्यक्तींच्या उत्पन्न वाढीस मदत करणे. स्वंय रोजगारांस प्रोत्साहन देणे त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी सहज शक्य होतात. तसेच सन 2015 ते 2016 मध्ये लघु उद्योगांच्या विकासासाठी श्री. नरेंद्र मोदी सरकारने मुद्रायोजना ही नवीन योजना चालू केली आहे.

(5) <u>उत्पादनात वाढ</u> :—

देशाच्या ग्रामीण भागातील कृषिक्षेत्र लघु उद्योग व स्वंय रोजगार क्षेत्राशी संबंधीत असणाऱ्या जनतेच्या उत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने सहकारी क्षेत्राची कामगीरी महत्वाची आहे

कृषीमालाला योग्य भाव मिळवून देणे कृषी क्षेत्राचा विकास करणे. प्रक्रिया उद्योगांची स्थापना करणे. लघु उद्योग कुटीर उद्योग व अन्यग्रामीण उद्योगांना अर्थसाह्य करणे. आधुनिक तंत्राचा वापर करणे. इ. मुळे उद्योजकांच्या उत्पन्नाचे प्रमाण वाढते. त्याच बरोबर दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे शक्य होते.

## (6) बचतीस प्रोत्साहन :-

सहकारी क्षेत्राच्या भूमिकेतून शेती क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. शेती उत्पादन शेतकऱ्यांचे उत्पन्न सामर्थ्य वाढ होवून ग्रामीण भागाचा विकास झाला आहे. सहकारी क्षेत्रामुळे ग्रामीण जनतेला बचतीची सवय झाली आहे. साखर कारखाने, सुतगिरण्या, दुग्ध उत्पादन संस्था, हे उद्योग सुरुवातीस ग्रामीण जनते-कडून भांडवल गोळा करून त्यांना बचत करण्यास भाग पाडतात. भांडवल हे अनेक प्रकारानुसार घातले जाते. बचत करण्यास सहकारी बँका पतसंस्था ग्रामीण जनतेला ठेवी स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन देतात.

Scanned with CamScanner

## (7) रोजगारात वाढ :—

सरकारने आर्थिक क्षेत्रात महत्वाची भूमीका पार पाडण्यास सुरुवात केल्यापासून देशात रोजगारांच्या संधी वाढत असून रोजगार व स्वंयरोजगार यात वाढ होत आहे. भारतात सर्व सहकारी साखर कारख्यान्यात प्रत्येकी 1000 पेक्षा अनेक लोकांना कायमचा रोजगार मिळाला असून हंगामी काळात भूमीहीन मंजूर व गरीब शेतकऱ्यांना तात्पुरता रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच ग्रामीण भागात असणारे लघू उद्योग व्यावसायिक स्वंय रोजगार करणाऱ्या व्यक्ती इत्यादींना कायमचे व्यवसाय मिळाले आहेत.

## (8) निर्यात व्यापारात सहभाग :—

जागतीकीकरणाच्या प्रक्रीयेत सहकारी संस्थांनी विदेशी व्यापारात मोठ्या प्रमाणात भाग घेण्यास सुरुवात केली असून सहकारी संस्था मार्फत कृषी उत्पादने दुग्ध उत्पादने, प्रक्रीया केलेला माल साखर भाजीपाला, फळे, या मालाच्या निर्यातीद्वारे देशाला मोठ्या प्रमाणात विदेशीचलन प्राप्त होत आहे.

अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्था या अत्यंत महत्वाची भूमीका पार पाडत असल्याचे दिसून येते.